वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–शनिवार दि.२० डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## टिक टिक वाजते डोक्यात, धड धड वाढते ठोक्यात

# कोण होतील बीडच्या नगराध्यक्षा ?

### उद्या १० वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात, सकाळी ११ वाजता पहिल्या फेरीचा निकाल हाती

### आज प्रभाग क्रं.३ मध्ये झाले रेकॉर्ड ब्रेक मतदान, ५.३० पर्यंत ७३ टक्के मतदान

### उद्या तुतारी की घडी, सट्टा बाजारात तुतारीचा जोरदार आवाज घुमतोय

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## अमरनाना यांच्या चेहऱ्यावरचे हसू उद्याच्या विजयाची निशानी



### परळी, अंबाजोगाई, धारूरच्या तुलनेत बीडमध्ये सर्वाधिक मतदान

जिल्ह्यातील परळी, अंबाजोगाई, किल्ले धारूर आणि बीड नगर पालिकांतर्गत न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे उर्वरित प्रभागांसाठी आज सकाळपासून मतदान प्रक्रिया सुरू झाली आहे. परळी, अंबाजोगाई आणि धारूरच्या तुलनेत बीडच्या प्रभाग क्र.३ ब ▸▸ पान २ वर

### प्रशासन सज्ज, पोलिसांचा चोख बंदोबस्त, अनेकांना शहर बंदी, हुल्लडबाजांना पोलिस प्रशासन चांगलाच हिसका दाखविणार

### रिकाम्या गप्पा (शेंगा) ठोकणाऱ्यांचा उद्या ऊत येईल

बीड, (दिव्य न्युज):– नगरपरिषदांसाठी २ डिसेंबरला मतदान झाले असून, याचा निकाल उद्या लागणार आहे. हा मतांचा पिटारा उघडल्यानंतरच कोणाला लागणार गुलाल व कोणाला लागला बुका याचा फैसला होणार आहे. जिल्ह्यातील सहा नगरपालिकांवर आमचीच सत्ता असा सर्वांकडून दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात मतदारांनी कोणाला मतदान रूपी आशीर्वाद दिला त्यांचीच सत्ता येणार आहे. यामुळे धाकधूक सर्वांच्या मनात आहे. मतमोजणीसाठी प्रशासनाची तयारी जवळपास पूर्ण झाली आहे. ▸▸ पान २ वर

### सामाजिकतेचा अन् सुसंस्कृततेचा जिल्हा बीड जिल्हा



छायाचित्रात शरद पवार गटाचे उमेदवार पिता जयमल्हार बागल आणि अमृत सारडा चर्चा करताना दिसतात. मतभिन्नता असली तरी संवादाची दारे बंद नाहीत. ही चर्चा केवळ राजकारणाची नाही, तर परस्पर आदराची, समजुतीची आणि परिपक्वतेची आहे.




प्रचारात शब्दांची तलवार उपसली जाते, आरोप–प्रत्यारोप होतात, विचारांची ठिणगी उडते. पण मतदानाच्या दिवशी मात्र तोच राजकारणाचा रणांगण लोकशाहीच्या उत्सवात बदलतो. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार अमर नाईकवाडे आणि भाजपचे अमृत सारडा विजयी मुद्रेत छायाचित्र देत असताना, एक संदेश ठळकपणे दिसतो– लढत संपते, लोकशाही पुढे जाते.

## छाती ठोकपणे सांगतेन की मी नाही का सांगितले ते निवडून येणार म्हणून, हं...मला माहितंच होत अशा रिकाम्या गप्पा मारणाऱ्यांची उद्या दिवसभर चालती राहिल

## अल्पसंख्याकांच्या मूलभूत हक्कांबाबत कृतिशील धोरण राबविण्याची मागणी

### आंतरराष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त जमीयत उलमा–ई–हिंदचे जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन






बीड, (दिव्य न्युज):– आंतरराष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील मुस्लिम व इतर अल्पसंख्याक समाजाला भेडसावणाऱ्या मूलभूत, शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय प्रश्नांबाबत राज्य शासनाचे लक्ष वेधणारे सविस्तर निवेदन जमीयत उलमा–ई–हिंदचे राज्य अध्यक्ष मोहम्मद नदीम सिद्दीकी यांच्या प्रमुख उपस्थितीत माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना जिल्हाधिकारी, बीड यांच्यामार्फत सादर करण्यात आले.राज्यात अल्पसंख्याक समाजात निर्माण झालेली भीती, असुरक्षितता व संभ्रम दूर होऊन विश्वासाचे वातावरण निर्माण होणे आवश्यक असल्याचा मुद्दा निवेदनात मांडण्यात आला आहे.

असे की,भारतीय संविधानाने अल्पसंख्याक समाजाला दिलेले धार्मिक स्वातंत्र्य, ▸▸ पान २ वर

### ३ लाख पगार, सरकारी घर, हवी तिथे नोकरी

## बुरखा प्रकरणातील डॉ. नुसरत यांना दिली मोठी ऑफर

दिल्ली, (वृत्तसेवा):– बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात एका मुस्लिम महिला डॉक्टरचा बुरखा ओढल्याच्या प्रकरणावरून देशभरात प्रतिक्रिया उमटत आहेत. बिहारमध्ये नवनियुक्त आयुष डॉक्टरांना नियुक्तीपत्रे वाटपाचा कार्यक्रम सुरू होता. यावेळी १० व्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतलेले नितीश कुमार एका महिला डॉक्टरला नियुक्तीपत्र देताना अचानक तिचा बुरखा ओढताना दिसले. त्यांच्या शेजारी उभे असलेले उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्नही केला, मात्र तोपर्यंत ही घटना कॅमेऱ्यात कैद झाली होती. यानंतर आता एका राज्याने बुरखा प्रकरणातील डॉ. नुसरत यांना मोठी ऑफर दिली आहे.

या घटनेमुळे महिला डॉक्टर नुसरत परवीन




यांना मानसिक धक्का बसला असून, त्यांनी बिहार सोडून थेट कोलकाता गाठले. विशेष म्हणजे, ज्या सरकारी नोकरीचे स्वप्न त्यांनी पाहिले होते, ती नोकरी जॉइन करण्यासही त्यांनी सध्या नकार दिला आहे. यानंतर आता झारखंडमधील हेमंत सोरेन ▸▸ पान २ वर

# सुप्रिया सुळेंना धनंजय मुंडेंना जेलमध्ये पाठवायचंय

### भुजबळांना जेलमध्ये पाठवण्यामागे शरद पवार, ओबीसी नेत्याचा दावा

बीड, (दिव्य न्युज):– राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे आणि पवार कुटुंबावर अत्यंत कडक शब्दांत टीका केली आहे. धनंजय मुंडे यांना लक्ष्य करणे आणि ओबीसी नेतृत्व संपवणे हा सुप्रिया सुळे यांचा मुख्य अजेंडा असल्याचा खळबळजनक आरोप बीड येथे बोलताना ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी केला.

वाघमारे म्हणाले की, धनंजय मुंडे हे एक आक्रमक आणि अभ्यासू ओबीसी नेते आहेत. त्यांना जाणीवपूर्वक मंत्रीपद मिळू नये आणि त्यांचे राजकीय करिअर उद्ध्वस्त व्हावे, यासाठी सुप्रिया सुळे यांनीच



त्यांच्याविरुद्ध मीडिया ट्रायल चालवली होती. सुळे यांना मुंडेंचा राजीनामा तर हवाच होता, पण त्यांना जेलमध्ये पाठवण्याचेही त्यांचे मनसुबे होते, असा दावा वाघमारे यांनी केला.

सुप्रिया सुळे यांच्यावर निशाणा साधताना वाघमारे यांनी काही जुन्या प्रकरणांचा उल्लेख केला. ते म्हणाले, सुप्रिया सुळे यांच्या भावाने ७०,००० कोटींचा घोटाळा केला, तेव्हा त्या गप्प का होत्या? त्यांनी स्वतःच्या भावाविरुद्ध आंदोलन का केले नाही? पार्थ पवार यांनी महार वतनाची जमीन घेण्याचा प्रयत्न केला, तरीही सुळे त्यांना क्लीन चिट देतात. छगन भुजबळ यांना जेलमध्ये पाठवण्यामागे शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांचेच षडयंत्र होते. वाघमारे यांनी थेट आरोप केला की, सुप्रिया सुळे आणि पवार कुटुंब हे ▸▸ पान २ वर

# एपस्टीन फाईल्सचा जगात भुकंप

## अमेरिकेसह भारतातील बड्या नेत्यांचे,उद्योगपतीचे नाव

## एपस्टीन मेलमध्ये पीएम मोदींसह केंद्रीय मंत्र्याचं नाव

### कनेक्शन सांगून पृथ्वीराज चव्हाणांचा खळबळजनक दावा



मुंबई , (दिव्य न्युज):- अमेरिकेच्या न्याय विभागाने जेफ्री एपस्टीनच्या चौकशीचा भाग म्हणून ३ लाख कागदपत्रे रिलीज केली आहेत. या कागदपत्रांचा आधारे काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी, भारतीय राजकारणात खळबळ उडवून देणारं कनेक्शन समोर आल्याचा दावा केला आहे.जेफ्र एपस्टीन याच्या मेलमध्ये पीएम नरेंद्र मोदी आणि पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी यांच्या नावाचा उल्लेख असल्याचा दावा पृथ्वीराज चव्हाण यांनी करत खळबळ उडवून दिली आहे.

काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत म्हटले आहे की, जेफ्री एपस्टीनच्या मेलमध्ये भारतातील आजी-माजी खासदार आहेत, त्याप्रमाणे पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी यांचं नाव एका ई-मेलमध्ये आहे. आणखी एका मेलमध्ये, अमेरिकेतली एक मोठा अधिकारी जो, ट्रप यांचा सल्लागार होता, स्टीम व्हॅनन नावाचा, तो एपस्टीनला विनंती करतो की, मला भारताच्या पंतप्रधानांना भेटायचं आहे. एपस्टीनकडून उत्तर येतं की, मी प्रयत्न करतो की, तुमची गाठ होईल का? नंतर काही दिवसांनी अशी ई-मेल येते की, मोदी ऑन बोर्ड. म्हणजे मोदी भेटायला तयार आहेत. मग मोदी अन् एपस्टीनचं काय नातं आहे, एपस्टीन मोदींशी कुणाशीही भेट घडवू शकतो. याच उत्तर सरकारकडून मिळावं लागेल, असेही चव्हाण यांनी म्हटलं आहे.

'अमेरिकेच्या जेफ्री एपस्टीनमध्ये अनेक प्रकरण समोर येणार आहेत. अमेरिका आणि भारतीय माध्यम त्याचा शोध घ्यावा लागेल. अमेरिका सरकारने खुल्या फाईल्समध्ये जेफ्री एपस्टीन आत्महत्या झाल्याचं सीसीटीव्ही फुटेज देखील आहे. दोन खटले सुरू असून, त्या खटल्यामध्ये काय काय पुरावे दिले गेले आहेत, विशेष म्हणजे महिलांची साक्ष देखील आहे. यात डिजिटल सामग्री देखील आहे. याचे विश्लेषण करायला वेळ लागणार आहे. परंतु जगातील सर्व पत्रकार यावर काम करत आहेत,' असे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले.

### एपस्टीन फाईल्समध्ये उद्योगपती अनिल अंबानी यांचेही नाव



मुंबई , (दिव्य न्युज):- माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कराडमध्ये पत्रकार परिषद घेऊन आज पुन्हा एपस्टीन फाईल्सवर जाहीर भाष्य केले. यावेळी त्यांनी मोदीज ऑन बोर्ड आणि भारताचे पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंह पुरी यांचा उल्लेख केला. त्यांनी त्याचवेळी उद्योगपती अनिल अंबानी यांचं नावही घेतलं. अर्थात एपस्टीन फाईल्समध्ये अनेक नेत्यांची आणि उद्योगपतींची नावं समोर येत आहेत. अर्थात त्यांचा या गुन्ह्याशी अथवा कृत्याशी थेट संबंध असेल असे नसल्याचेही पृथ्वीराज चव्हाण यांनी स्पष्ट केले. एपस्टीन हा विकृत होता. त्याने वलय वापरून अनेकांशी संबंध ठेवले होते. हा ३०० ऋइ डेटा आहे. त्यातून अनेक खुलासे समोर येतील असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

मी माहिती दिली होती अमेरिकेत काही घटना घडत आहे.जेफ्री एपस्टीन अनेक बाल लैंगिक छळ केला. अमेरिकेच्या दोन्ही खासदाना जेफ्री एपस्टीन प्रकरणातील माहिती फोटो,व्हिडिओ बाहेर काढव्या लागल्या. गेल्या ३० वर्षाचा हा डेटा आहे.प्रचंढ मोठा पुरावा जेफ्री एपस्टीन प्रकरणात आहे.जनतेच्या दबावामुळे अमेरेकेना सर्व माहिती प्रकाशित करावे असा कायदा केला. त्यावर ट्रम्प यांना कायदा करावा लागला,तीस दिवसांच्या आता ही सर्व माहिती समोर आली पाहिजे असं ठरले. त्या प्रमाणे माहिती समोर येत असल्याचे चव्हाण यांनी स्पष्ट केले.

त्या प्रकरणात कोणती माहिती त्याला शोधण्यासाठी वेळ लागले. एपस्टीन फाईलवर सरकारने उत्तर द्यावं.जी माहिती आली आहे त्याता काही भारतीयांचे नाव आहे. पेट्रोलियम मंत्री हरिम पुरू यांचं नाव आहे. एपस्टीन फाईल खुल्या व्हायला अजून वेळ लागेल.३०० जीबी डेटा आहे ,९५ हजार फोटो आहेत.मोदी ऑन बोर्ड असा संदेश एपस्टीनने ट्रम्प यांच्या सल्लागाराला दिला होता. त्यामुळे एपस्टीन आणि मोदी यांची ओळख काय.मोदींचा संदर्भात हा २०१४चा आहे. तो देह व्यापर करतो हे माहिती असतना त्यांच्याशी संपर्का का असा सवाल त्यांनी केला. नाव समोर आल्यावर एकहीही व्यक्ती स्पष्टीकरण देत नाही. त्या माणसाचा ह्यांचा संबंध आला कसा आला हे समोर आले पाहिजे. प्रिन्स अँड्र्यू यांचं सुद्धा नाव आले होते, त्यांच्याविरोध केस झाली होती. मात्र त्यांनी कोट्यावधी देऊन हे प्रकरण बाहेर मिटवण्यात आले होते.इतिहासात कधी एवढ डिस्क्लोजर झाले नव्हेत.ज्यांच्यावर अत्याचार झाले, त्यांचे फोटो ब्लर केले आहेत, अशी माहिती पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली.

पान ४ वरून

## जिंतूरचा मुख्य रस्ता

जिंतूर यांना जाहीर निवेदन देत तात्काळ कठोर कारवाईची मागणी केली आहे. सर्व अतिक्रमणे कायमस्वरूपी हटविणे, पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने संयुक्त मोहीम राबविणे, पुन्हा अतिक्रमण झाल्यास थेट गुन्हे दाखल करणे व झालेल्या कारवाईचा लेखी अहवाल जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली आहे.जर या मार्गावर भविष्यात कोणताही अपघात, जीवितहानी किंवा गंभीर घटना घडली, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषद प्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांवर राहील, असा थेट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.दरम्यान या निवेदनाच्या प्रती पोलीस निरीक्षक जिंतूर, तहसीलदार जिंतूर यांना प्रत्यक्ष देण्यात आल्या असून जिल्हाधिकारी परभणी, पोलीस अधीक्षक परभणी व उपविभागीय अधिकारी सेलू यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत. ठोस कारवाई न झाल्यास जिंतूर शहरात तीव्र आंदोलन, उपोषण व कायदेशीर लढा उभारला जाईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे.

## महानगरपालिका

महाराष्ट्र विधानसभेत अल्पसंख्याक समाजातील महिला प्रतिनिधींची संख्या पूर्वी अत्यंत कमी राहिली आहे. अशा परिस्थितीत सना मलिक शेख यांचे विधानसभेत पोहोचणे हे महिलांच्या, विशेषतः मुस्लिम महिलांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. त्यांच्या विजयामुळे शहरी राजकारणात एक नवा अध्याय जोडला गेला आहे.

राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, आगामी महानगरपालिका निवडणुका लक्षात घेता महाराष्ट्र मंत्रिमंडळात मोठ्या फेरबदलाची तयारी सुरू आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाने अणुशक्ती नगरच्या आमदार सना मलिक शेख यांच्यावर शहरी भागात निवडणूक जबाबदाऱ्या सोपवण्याचा आराखडा तयार केल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षाला मुस्लिम, उर्दू भाषिक आणि शहरी मतदारांमध्ये आपली पकड मजबूत करण्यास मदत मिळण्याची आशा आहे.

महानगरपालिका निवडणुकांनंतर आचारसंहिता संपताच सना मलिक शेख यांचा मंत्रिमंडळात समावेश करून त्यांना मंत्रिपद दिले जाऊ शकते, अशी शक्यताही वर्तवण्यात येत आहे. हा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसची शहरी राजकारणातील मजबुती आणि पुरोगामी प्रतिमेचा भाग म्हणून पाहिला जात आहे.

मुंबई, मालेगाव, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) आणि अकोला यांसारख्या शहरांमध्ये मुस्लिम लोकसंख्या लक्षणीय आहे. गेल्या काही वर्षांत या भागांत एमआयएम आणि इतर पक्षांचे

राजकीय आव्हान निर्माण झाले आहे. अशा स्थितीत सना मलिक शेख यांना पुढे करणे ही पक्षाच्या एका संघटित रणनीतीचा भाग असल्याचे सांगितले जात आहे, जेणेकरून शहरी आणि अल्पसंख्याक मतपेढी अधिक मजबूत करता येईल.

सना मलिक शेख या जमिनीवर सक्रिय असलेल्या, लोकभिमुख आणि पक्ष नेतृत्वाच्या विश्वासू सदस्या मानल्या जातात. महिला, तरुण आणि अल्पसंख्याकांसाठी त्यांचा आवाज स्पष्ट आणि प्रभावी राहिला आहे. बजेटमध्ये वाढ, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था, वसतिगृहांची उभारणी आणि मूलभूत सोयीसुविधांचा विकास यांसारख्या गोष्टी त्यांच्या प्राधान्यक्रमात आहेत.राजकीय विश्लेषकांच्या मते, जर महानगरपालिका निवडणुकीनंतर सना मलिक शेख यांना मंत्री बनवले गेले, तर हा निर्णय शहरी तरुण, उर्दू भाषिक वर्ग आणि अल्पसंख्याक महिलांमध्ये सकारात्मक संदेश देईल आणि त्यांना एक आधुनिक, सक्षम आणि प्रगतशील नेतृत्व म्हणून नवी ओळख मिळेल.एकूणच, महानगरपालिका निवडणुकीत सना मलिक शेख यांची भूमिका केवळ निवडणूक रणनीतीपुरती मर्यादित नसेल, तर ती महाराष्ट्राच्या राजकारणात महिला आणि अल्पसंख्याकांच्या प्रबळ प्रतिनिधित्वाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

## उद्धव ठाकरेंना

महापालिकेची निवडणूक आचारसंहिता सुरू झाली आहे. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान आणि १६ जानेवारी रोजी  मतमोजणी होणार आहे. पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजपा आणि राष्ट्रवादी अजित पवार गट स्वबळावर लढणार आहेत. या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे.

पान १ वरून

## कोण होतील

राज्यासह बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, अंबाजोगाई, परळी या सहा नगरपालिकासाठी दि. २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली आहे. परंतु काही नगरपालिकांची निवडणूक पुढे ढकलण्यात आल्याने निकाल ही पुढे ढकलण्यात आला. आज त्या नगरपालिकांसाठी मतदान होत असून, यासह सर्व नगरपालिकांचे निकाल उद्या लागणार आहेत. मतमोजणीची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरूवात होणार आहे. दुपारी ३ वाजेपर्यंत निकाल हाती येतील अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. या निवडणुकीत आमचाच विजय होणार असा सर्वांकडून दावा करण्यात येत आहे. पण विजय त्यांचाच होणार ज्यांना मतदारांचा मतदान रुपी आशीर्वाद मिळाला आहे. हा मतदानाचा पिटारा उद्या रविवारी उघडणार आहे यातून गुलाल कोण उधळणार हे ठरणार आहे. यासाठी अवघे काही तास शिल्लक राहिले असल्याने मतदारांची धाकधूक वाढली असून, अनेकांनी आपलाच विजय व्हावा म्हणून देव पाण्यात ठेवले आहेत. तर सहा ही नगरपालिकांमध्ये अंत्यंत चुरशीची लढत झाली असल्याने याचा निकाल काय असणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. तरीही यामध्ये परळी महायुती, गेवराई भाजपा, माजलगाव राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.), धारुर राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.), असा अंदाज असून, बीड आणि अंबाजोगाई मध्ये मात्र अनेकांनी अंदाज लावणे कठीण असल्याचे सांगितले आहे. हे केवळ अंदाज असून याचा फैसला उद्या रविवारी होणार आहे.

## परळी, अंबाजोगाई,

मध्ये दुपारपर्यंत सर्वाधिक मतदानाची नोंद झाली आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार दुपारी २ वाजेपर्यंत बीडच्या प्रभाग क्र.३ ब मध्ये ५० टक्के, परळीत ३५ टक्के, अंबाजोगाईत ३५ टक्के तर धारूरमध्ये ३० टक्के मतदानाची नोंद झाली होती. बीडमध्ये प्रभाग क्र. ३ ब साठी उमेदवार अमर नाईकवाडे, अमृत काका सारडा यांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदान प्रक्रियेदरम्यान आ.संदीप क्षीरसागर, आ.विजयसिंह पंडित, संपादक शेख मुजीब, शेख निजाम, योगेश क्षीरसागर, फारूक पटेल, अशफाक इनामदार, मोईन मास्टर, बाळासाहेब गुंजाळ यांनी मतदान केंद्राला भेट दिली.

## अल्पसंख्याकांच्या मूलभूत

समानतेचा अधिकार, शिक्षणाचा हक्क व सांस्कृतिक संरक्षण हे अधिकार प्रत्यक्ष अंमलबजावणीत प्रभावीपणे दिसून यावेत, यावर निवेदनात भर देण्यात आला आहे. विशेषतः नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी जन्म दाखलाच अनिवार्य असल्याचा गैरसमज मोठ्या प्रमाणावर पसरलेला असून, त्यामुळे अल्पसंख्याक, भटक्या व वंचित समाजात अस्वस्थता वाढत असल्याची बाब अधोरेखित करण्यात आली आहे. नागरिकत्व अधिनियम १९५५ व नियम २००९ नुसार

जन्म दाखला हा एकमेव पुरावा नसल्याचे वास्तव निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सह-शिक्षणासंदर्भातील शासन निर्णयांचा परिणाम अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या संविधानिक अधिकारांवर होऊ नये, याकडे निवेदनात लक्ष वेधण्यात आले आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०(१) अंतर्गत अल्पसंख्याकांना त्यांच्या पसंतीनुसार शैक्षणिक संस्था चालविण्याचा अधिकार असून, या अधिकारांचे संरक्षण होणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.शाळा व शासकीय कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम्, सूर्यनमस्कार अथवा धार्मिक स्वरूपाच्या उपक्रमांबाबत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये, तसेच धार्मिक स्वातंत्र्याचा सन्मान राखला जावा, हा मुद्दा निवेदनात मांडण्यात आला आहे. विविध धर्मांच्या श्रद्धा व भावनांचा परस्पर सन्मान राखणे हे घटनात्मक मूल्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

निवेदनात लव्ह जिहाद, लँड जिहाद यांसारख्या शब्दप्रयोगांमुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावनांवर विपरीत परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. 'जिहाद' ही संकल्पना आत्मशुद्धी, ज्ञानप्राप्ती व अन्यायाविरुद्ध संघर्षाशी निगडित असून, तिचा अर्थ विकृत स्वरूपात मांडला जात असल्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. प्रार्थनास्थळ (विशेष तरतुदी) अधिनियम १९९१ अस्तित्वात असताना अल्पसंख्याकांच्या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांबाबत वाद निर्माण होत असल्याचे वास्तव निवेदनात नमूद करण्यात आले आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात असलेली धार्मिक ओळख कायम ठेवण्याचा कायदा प्रभावीपणे अंमलात राहणे आवश्यक असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.उर्दू भाषा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा भाग असून तिच्या संवर्धनासाठी जिल्हानिहाय उर्दू घर, ग्रंथालये व सांस्कृतिक केंद्रांची आवश्यकता निवेदनात मांडण्यात आली आहे. तसेच गुंठेवारी अधिनियमांतर्गत मदरसा, मस्जिद व अल्पसंख्याक वस्त्यांच्या नियमितीकरणाचा प्रश्नही निवेदनात समाविष्ट आहे.

१५ कलमी अल्पसंख्याक कार्यक्रमाची अंमलबजावणी, अल्पसंख्याक आयुक्तालय, वक्फ बोर्ड, उर्दू अकादमी व मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यक्षमतेशी संबंधित मुद्द्यांचा निवेदनात सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. राज्यातील वक्फ जमिनीवरील अतिक्रमण, अर्थसंकल्पीय तरतूद, तसेच शिक्षण, आरोग्य व रोजगाराशी संबंधित प्रश्नांवरही निवेदनात प्रकाश टाकण्यात आला आहे.

द्वेषमूलक वक्तव्ये, मॉब लिंचिंगसारख्या घटनांमुळे समाजात तणावाचे वातावरण निर्माण होत असल्याचे नमूद करत, भीतीमुक्त व कायद्यावर आधारित सामाजिक वातावरणाची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. सच्चर समिती, रंगनाथ मिश्रा आयोग व डॉ. मेहमूद-उर-रहमान अभ्यास गटाच्या शिफारशींचा उल्लेख करत, अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दीर्घकालीन धोरणात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे निवेदनात मांडण्यात आले आहे. यावेळी जमीयत उलमा-ई-हिंदचे मुफ्ती अब्दुल्लाह (जिल्हा सदर) मौलाना साबेर साहब (जनरल सेक्रेटरी), मुजतनबा खान सर (मराठवाडा नायब सदर), काझी मुजीब सर (सद्भावना मंच बीड), काझी जफर मलिक,मौलाना अफसर,हाफेज मन्सूर,हाफेज सरताज,डॉ.इमरान,इलयास इनामदार सर,सय्यद असेफ,मुदस्सर सिद्दिकी,सय्यद नाजेम,इकबाल भाई,साजिद भाई सह जमीयत उलमा-ई-हिंदचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुरखा प्रकरणातील

सरकारने डॉ. नुसरत यांना सरकारी नोकरीची मोठी ऑफर दिली आहे.

झारखंड सरकारचे आरोग्य मंत्री डॉ. इरफान अन्सारी यांनी डॉ. नुसरत यांना झारखंड आरोग्य सेवेत ३ लाख रुपये दरमहा पगाराची नोकरी, त्यांच्या पसंतीची पोस्टिंग, सरकारी निवासस्थान आणि संपूर्ण सुरक्षा देऊ केली आहे. एका निवेदनात सांगितले की, या नियुक्तीत त्यांना आदर आणि सुरक्षा दोन्हीची हमी दिली जाईल. बिहारच्या महिला डॉ. नुसरत परवीन यांच्यासोबत घडलेली घटना अमानवी आणि हृदयद्रावक आहे. यामुळे संपूर्ण देशाला हादरवून सोडले आहे. ज्या प्रकारे एका डॉक्टर महिलेचा अपमान करण्यात आले, ते केवळ एका व्यक्तीवर हल्ला नाही तर मानवी प्रतिष्ठा, महिलांचा आदर आणि संविधानावर थेट हल्ला आहे, या शब्दांत डॉ. अन्सारी यांनी या घटनेवर तीव्र टीका केली. दरम्यान, झारखंडचे आरोग्यमंत्री पुढे म्हणाले की, मी प्रथम एक डॉक्टर आहे, नंतर मंत्री आहे. कोणत्याही डॉक्टर किंवा महिलेच्या प्रतिष्ठेशी तडजोड करणे झारखंडमध्ये शक्य नाही. एका डॉक्टरशी संबंधित ही घटना सर्व वैद्यकीय कर्मचाऱ्यांना खूप दुखावणारी आहे. ती महिला आणि तिच्या कुटुंबावर काय परिस्थिती आली असेल, त्याची कल्पनाच करू शकत नाही, असेही ते म्हणाले.

## सुप्रिया सुळेंना

जातीवादी आहे. त्यांना दलित, मुस्लिम, ओबीसी आणि आदिवासी समाज चालत नाही.

वाघमारे यांनी आगामी राजकीय गणितांवर भाष्य करताना सांगितले की आमदारांची संख्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ओबीसींचे ३९ आमदार वाढले आहेत, तर मराठा समाजाचे १८ आमदार कमी झाले आहेत. येणाऱ्या काळात आम्ही ओबीसींचे १०० आमदार वाढवू आणि मराठ्यांचे १०० आमदार कमी करू तसेच रोहित पवार आणि मनोज जरांगे यांच्यासोबत जाणाऱ्यांना ओबीसी समाज त्यांची योग्य जागा दाखवून देईल, असे म्हणाले. सुप्रिया सुळे यांचा पक्ष आता संपलेला आहे. ओबीसी समाजाने आता त्यांना त्यांची जागा दाखवण्याचे ठरवले असून येणाऱ्या काळात त्यांचा पक्ष पूर्णपणे निस्तनाभूत होईल. असे ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी म्हटले आहे.